भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.२०१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०४/२०१७

**१) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २९/०४/२०१७ चे १७.३० ते १८.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन पिडीत मुलगी वय ९ वर्ष ही आपल्या घरासमोर प्लास्टीकची पतंग खेळत असतांना तीचे घराशेजारी राहणारा आरोपी याने पिडीत मुलाचा हात धरुन आपले घरी नेले व तिला पेपसी खायला दिली त्या नंतर त्याने स्वःताच्या अंगावरील कपडे काढुन, अश्लिल शब्दात बोलुन विनयभंग केल्याने. त्यावरुन पिडीत मुलगी माझी आई रागवेल म्हणुन निघुन आली व फिर्यादीस सर्व हकीकत सांगीतल्यावरुन फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व पिडीत मुलीचे वैदयकीय परीक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३५४,(अ) (१)(२) भांदवि. सह कलम बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी राउत पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

**२) क्षुल्लक कारणावरून हयगयीने,लापरवाहीने पेनाचे टोकर काढुन पेन फेकुन मारून गंभीर दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०७/०४/२०१७ चे ०८.०० ते ११.०० वा. दरम्यान यातील जखमी अर्थव बादल श्रीपात्रे वय ०५ वर्ष रा. जांब हा वर्गात क्लास वर्क करित असतांना मागे वळुन पाहीले असता त्याला समोर पाहावे म्हणुन आतील आरोपी शिक्षीकेने हयगयीने लापरवाहीने तीच्या हातातील पेनाचे टोकर काढुन पेन फेकुन मारल्याने त्या पेनाचे टोक अर्थवच्या डोळयाला लागुन गंभीर दुखापत झाल्याने वैदयकिय रिपोर्ट व चौकशी अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी पोना केने यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३३८ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि म्हेसकर पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**३) धुऱ्याचा कचरयाला निष्काळजीपणे आग लावुन आग पेटत जावुन शेतावरिल ईलेक्ट्रीक मोटार व साहीत्य जळुन नुकसान झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९/०४/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान यातील आरोपीने आपले जनावरे चारण्याकरिता दुलीचंद बांते रा. भिलेवाडा यांचे शेतात नेले होती धुऱ्याचा कचरा पेटवा म्हणुन निष्काळजीपणे आग लावुन निघुन गेला त्यामुळे ती आग पेटत पेटत नाल्यावर ठेवलेली फिर्यादीची मोटार पंप पर्यत जावुन फिर्यादीची टेक्समो कंपनीची ईलेक्ट्रीक मोटार, फुटबॉल पाईप व प्लॉस्टीक पाईप एकुन किं. १२,५००/रू. चा माल जळुन नुकसान झाल्याने फिर्यादी रामेश्वर बंडुजी हजारे वय २८ वर्ष रा. कचरखेडा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८५,४२७ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोंगाडे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) बॅग मधिल मोबाईल चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९/०४/२०१७ चे १३.३० ते १७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हे आपले लिनीओ कंपनीचा मोबाईल आयमईआय नं.१) ८६२३१२०३९६४३५६२ २) ८६२३१२०३३५६२९७२असलेला किं. ८,४९९/रू. आपले बॅग मध्ये ठेवुन बॅग पांडव कॉलेजच्या वरांडयात ठेवुन पेपर देण्यास गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने मोबाईल बॅग मधुन काढुन चोरून नेल्याने फिर्यादी कु. संगीता संजय नागदेवे वय २० वर्ष रा नाशीक नगर लालालचपतराय वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**५) ट्रक चालकाच्या निष्काळजीपनामुळे पायी रोडाने जाणाऱ्या ईसमास धडक मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २९/०४/२०१७ चे १५.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन वळणाच्या रस्त्या वरून हळुवारपणे चालवीने अपेक्षीत असतांना सुध्दा त्याने त्याचे वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन जखमी रणवीर भिवाजी कोल्हे वय ४० वर्ष रा. रूयाळ हा पायदळ रोडाने जात असता त्यास धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी उध्दव दादाजी नागपुरकर वय ५५ वर्ष रा रूयाड यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

**६) अवैध दारु अड्डयावर / जुगारावर धाडी . :—**

दिनांक २९/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. जवाहरनगर, साकोली, लाखांदुर,येथे अवैध दारु अंडयावर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ६० लिटर हा.भ.दारू + ५१५ के.जी. सडवा मोहा साहीत्य किंमती ३४,२५०/—रु, १३ लीटर २३० मीली.लीटर देशी दारू. किंमती ३,८९५/—रु, तसेच जुगारातुन किंमती ९१६/रू. माल असा एकुण किंमती ३९,०६१/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २९/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन ९६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.